Nutrition Rights Coalition

पोषण-कुपोषणाचे

# सकस

संवादपत्र

वर्ष - दुसरे

अंक - चौदावा, मे, २०२०

कम्यूनिटी ॲक्शन फॉर न्यूट्रिशन (कॅन) प्रक्रियेचे वार्तापत्र



## कोरोना भुक नि कुपोषणाचे आरिष्ट

कोरोनाच्या आरिष्टाने कुपोषण व भुकेचा प्रश्न तीव्र होत आहे. या पार्श्वभुमीवर समाजात कार्यरत असणारे तज्ज्ञ व कार्यकर्त्यांचे चिंतन...

पोषण-कुपोषणाचे
सकस
संवादपत्र

संपादन
शैलेश डिखळे, विनोद शेंडे

कार्यकारी संपादक
प्रशांत खुंटे

सल्लागार मंडळ
डॉ. आशिष सातव
महान ट्रस्ट, मेळघाट, अमरावती
ल. गो. ढोके
आदिवासी विकास विभाग
डॉ. अभय शुक्ला
ए.जी.सी.ए. सदस्य, राष्ट्रीय आरोग्य मिशन
डॉ. सतीश गोगुलवार
आम्ही आमच्या आरोग्यासाठी
डॉ. शुभलक्ष्मी अय्यर
आरोग्य व पोषण तज्ज्ञ
श्रीमती नंदीनी अवाडे
आदिवासी विकास विभाग
डॉ. मुहम्मद सफवान पटेल
आदिवासी विकास विभाग
प्रिती पवार, आदिवासी विकास विभाग

संकलन
नितीन घाटगे | मानसी श्रौती
सचिन साठे | शंकर शिर्के

सहभागी संस्था
आम्ही आमच्या आरोग्यासाठी (गडचिरोली)
जनार्थ आदिवासी विकास संस्था (नंदूरबार)
कामगार व मजूर संघ-कष्टकरी संघटना (पालघर)
वचन (नाशिक); वननिकेतन (ठाणे)
दिशा संस्था (रायगड)
रचना सामाजिक पुनर्बांधणी संस्था (पुणे)
राज्य समन्वयक संस्था, अनुसंधान ट्रस्ट साथी (पुणे)

मुखपृष्ठ व आतील मांडणी
स्वप्नदीप क्रिएटिव्हज्, पुणे

मुद्रित शोधन : शारदा महल्ले

मुद्रण : एन.आर. एंटरप्रायझेस, पुणे

पत्रव्यवहारासाठी पत्ता
साथी, फ्लॅट नं.- ३ व ४, अमन ई टेरेस,
डहाणूकर कॉलनी, कोथरुड, पुणे-३८.
दूरध्वनी : ०२०- २५४ ७२३२५,
ई-मेल - sathicehat@gmail.com



# कोरोना अरिष्ट
# अन्न अरिष्टात रुपांतर होईल ?

## चंद्रकांत यादव

**कोरोना आपत्तीच्या काळात रेशनिंग व्यवस्थेपुढील आव्हानांबाबत रेशन बचाव समितीचे प्रवक्ते चंद्रकांत यादव यांचे चिंतन...**

▶ संपूर्ण जगाला कोरोनाने व्यापुन टाकले आहे. या संसर्गजन्य आजारावर अद्याप लस उपलब्ध नाही. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी त्याचेपासून लांब राहणे हाच पर्याय आहे. जगामध्ये सार्वजनिक वावरावर नियंत्रण आणणे हाच तात्कालिक उपाय आहे. देशाच्या पंतप्रधानानी यावर लॉकडाऊन घोषीत केले आणि या आजाराची साखळी तोडणे संसर्गाने होणारी हानी कमी करणे या उद्देशाने प्रथम २१ दिवस घोषीत केले. आता ३ मे पर्यंत लॉक डाऊन आहे.

अखिल भारतीय पातळीवर एखादा निर्णय घोषीत करताना सर्वसामान्य माणसावर याचा काय परिणाम होईल याचा विचार सरकारने केला असणारच. त्याचे परिणाम समोर दिसत असतानाही नाईलाजाने सरकारने टोकाचे पाऊल उचलले असेल किंवा उचलावे लागले असेल. भारतात योजना आयोग जाऊन नीती आयोग आला आहे. या नीती आयोगाच्या कारभाराबाबत बरेच प्रश्न उपस्थित आहेत.

जागतिक पातळीवर जसे युनोचे अस्तित्व संपुष्टात येत आहे आणि जागतिक व्यापार संघटनेचे महत्त्व वाढत आहे त्याच प्रमाणे लोकांची गरज विचारात घेऊन विकासाचा विचार केला पाहिजे. पण जागतिक व्यापार संघटनेचे वर्चस्व वाढताच नफा कसा वाढेल परवडेल का, गरज काय ? असा विचार होऊ लागला. कल्याणकारी व्यवस्थेवरील खर्च कमी होऊ लागला. सार्वजनिक जबाबदाऱ्या कमी करुन त्याचे खाजगीकरण होऊ लागले. हे निती आयोगामुळेच.

देशाचे इन्फ्रास्ट्रक्चर असलेले उद्योग - सार्वजनिक वाहतुक - रस्ते विकास - बँकींग उद्योग - अवजड उद्योग - शेती उद्योग - अत्यावश्यक वस्तुचा व्यापार या साऱ्या क्षेत्रात खासगीकरण येत असतानाच राज्यकर्ते प्रशासन यंत्रणा याच

बाजुने विचार करताना धोरण ठरवताना दिसत आहे.

कोरोना महा भयंकर आपत्तीच्या काळात सरकारने घोषीत केलेल्या योजना किती तकलादू आहेत हे स्थलांतरीत मजुर, योजना कर्मचारी याचे प्रश्न पाहुन म्हणावे लागेल. देशातील प्रत्येक शहरात हजारो मजुर आपल्या गावी जाण्याच्या मन:स्थितीत आहेत. काही रस्त्यास लागले आहेतच. विकासाच्या प्रक्रियेत असणाऱ्या लाखो योजना कर्मचाऱ्यांच्या बाबत सरकारची भूमिका कितपद संवेदनशील आहे हा एक प्रश्नच आहे. आशा वर्कर्स व अंगणवाडी सेविकांना कोरोनाच्या काळात दिलेल्या सेवेसाठी मृत्यूपरांत ५० लाखाचा विमा सरकारने जाहीर केलाय, पण या आरिष्टाच्या काळात दिवसभर काम करणाऱ्या या सेवकांना दिवसभराच्या कामासाठी चहापानाचा खर्च म्हणून केवळ ३० रूपये भत्त जाहीर झाला आहे. याला संवेदनशीलता म्हणावे का?

कोरोना आपत्तीच्या काळात अन्न आरिष्टाबाबत सरकार कोणत्या बाजूने पाहते याकडे जास्त डोळसपणे पहावयास पाहिजे. कारण या आपत्तीत भुकेचा प्रश्न आवाहन म्हणून उभा आहे. उत्पन्नाची साधने ठप्प आहेत. ती कधी चालु होतील हे सांगता येत नाही. जरी लॉकडाऊन संपुष्टात आले तरी समाजव्यवस्था - अर्थव्यवस्था एका रात्रीत काही पुर्वपदावर येणार नाही. नागरिकांची खरेदी शक्ती त्वरीत कार्यान्वीत होणार नाही. आशा काळात माणसाच्या रोजी-रोटीबाबत काय विचार केला आहे याबाबत अद्याप स्पष्टता नाही. लॉकडाऊन कधी संपणार या घोषणेकडे सामान्य माणुस डोळे लाऊन बसला आहे.

या आपत्तीच्या काळात जन चवळवळीच्या रेट्याने टिकुन राहिलेली सार्वजनिक वितरण व्यवस्था हा एकमेव पर्याय अन्न सुरक्षेसाठी पुढे आला आहे. रेशनवर मिळणारा गहु, तांदुळ सरकारच्या नियंत्रित मार्केटमध्ये असल्यामुळे काही प्रमाणात नागरिकांना दिलासा मिळाला. सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे डी.बी.टी. (डायरेक्ट बेनीफिट ट्रान्सफरेशन) झाले असते तर काय झाले असते याची कल्पना सुध्दा करता येत नाही.

लोक आन्दोलनाने सरकारवर सातत्याने अंकुश ठेवल्यामुळेच प्रशासकीय भ्रष्टाचाराने बोकाळलेली सार्वजनिक वितरण व्यवस्थेनेच लाखो टन धान्य जनतेस वितरीत केले हे वास्तव कोणी नाकारु शकत नाही.

'अन्न सुरक्षा कायदा-२०१३' अस्तित्वात असला तरी यातून मिळालेली अन्न सुरक्षा व्यवस्था 'टार्गेटेड' आहे. अन्त्योदय, लाभार्थी, केशरी कार्डधारक - पांढरे कार्डधारक यामध्ये ही अन्न वितरण प्रणाली विभागली आहे. २०१०-२०११ या आर्थिक सामाजिक सर्व्हेक्षणाच्या आधारावरच शहरी भागात ५०% ग्रामीण भागातील ७५% अन्नाचा अधिकार निश्चित झाला.

अन्न सुरक्षा कायदा- २०१३ हा महाराष्ट्रात फेब्रुवारी २०१४ ला लागु झाला. महाराष्ट्रातील शहरी ग्रामीण भागातील ६५% जनतेचा अन्नाचा अधिकार निश्चित झाला. या योजने मध्ये अंत्योदय, लाभार्थी, हे दोनच घटक पात्र ठरले. अंत्योदय कार्डधारकास कार्डास ३५ किलो धान्य, लाभार्थी कुटूंबास माणसी ५ किलो कार्डावर नोंद असलेल्या इसम संख्येवर धान्य देण्याचे निश्चित झाले. या घोषीत योजना टार्गेटेड असल्यामुळे २०१०-२०११ च्या सर्व्हेवर अवलंबून असल्यामुळे कार्डावरील संख्या प्रत्यक्ष इ-पास मशिनवर आलेली संख्या यात तफावत आढळते. तसेच २०१०-११ ते २०२० पर्यंत वाढीव व कमी केलेले फेरफार ऑन लाईन द्वारे वेळीच दुरुस्त केले गेले नाहीत. प्रशासकीय अधिकाऱ्याचा हलगर्जीपणा या रेशनमधील असंतोषास कारणीभुत आहे. पण परिणाम नागरिकास भोगावे लागतात. आरोपीच्या पिंजऱ्यात रेशन दुकानदार उभा आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेशिवाय दुसरी कोठलीही व्यवस्था अन्न सुरक्षेसाठी सरकारकडे उपलब्ध नाही. सातत्याने या व्यवस्थेचे सक्षमीकरण करण्याचा १९६/२००१ जनहित याचिकेच्या हस्तक्षेपानेच प्रयत्न यशस्वी झाला. कायदा जरी संसदेस पास झाला असला तरी अन्न सुरक्षा कायदा व्हावा म्हणून सुप्रिम कोर्टात पी यु सी एल विरुध्द भारत सरकार ही न्यायालयीन लढाई सातत्याने २००१ ते २०१७ पर्यंत चालुच होती. या सिस्टीममधील पॉस मशिन (पॉईन्ट ऑफ सेल) आधार आधारभुत आयडेन्टीफिकेशन धान्याचे दर याबाबत डायरेक्शन सुप्रिम कोर्टानेच केले आहेत. लोकसभा-राज्यसभेत या बिलावर चर्चा ८।। तास झाली. अशातऱ्हेचे कल्याणकारी कायदे हे राज्यसत्ता हातात असणाऱ्या पक्षांनी स्वयंप्रेरित पक्षाच्या धोरणाचा भाग म्हणून केले पाहिजेत. पण अन्न सुरक्षा कायदा २०१३ सुप्रीम कोर्टाच्या मार्गदर्शनाने संसदेच्या पटलावर आला.

कोरोना च्या निमित्ताने अन्न सुरक्षेचे कवच किती आवश्यक आहे हे राज्यकर्त्यांना जनतेस सुध्दा दिसून आले. हे कवच नसते तर खासगी व्यापारीकरणाने मॉल्सुसह नव्या व्यापारी संस्कृतीने जनतेची लूट केली असती. गहु-तांदुळ सोडून इतर सर्व वस्तुचे दर आजही गगनाला भिडले आहेत. रेशन संपले. रेशनचे आम्ही खात नाही, रेशन बंद झाले असे म्हणणाऱ्या जन विभागाने रेशनकार्डे हुडकून पाळीत जाऊन उभा राहिले. आता तर प्रिन्ट मिडीया असो, इलेक्ट्रॉनिक मिडीयात रेशनवर बातमी नाही असा दिवस नाही.

कोरोना आपत्तीच्या निमित्ताने रेशनच्या नियंत्रित व्यापाराचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. ही रेशनिंग प्रणाली जनतेच्या संघटीत ताकदीवर सक्षम करण्याचे आवाहन आपल्यासमोर आहे. रेशन व्यवस्था आपोआप बदलेल, राज्यकर्ते बदलतील यावर विश्वास ठेवणे म्हणजे स्वप्नरंजन ठरेल.

कोरोना आपत्तीच्या काळातही आज जगात पुरेसा अन्न साठा असल्याचे संकेत पुढे आले आहेत. गरजुपर्यंत अन्न वितरणाचा मुद्दा गंभीर आहे. मुक्त व्यापार, खुला बाजार याचा अनुभव फार चांगला नाही. भारताच्या अनुभवातुन पाहिल्यास कोरोना

महामारीच्या काळात भारतीय रेशन व्यवस्था डी.बी.टी. - डायरेक्ट बेनिफीट ट्रान्सफरेशनमुळे खिळखिळी झाली असती तर काय होऊ शकते हे चंदीगड, पाँडेचेरीतील अनुभवातुन दिसुन येते. हजारो लोक रस्त्यावर आले आणि त्यांनी पैसे नकोत धान्यच पाहिजे अशी मागणी केली. भारतीय परिस्थितीत व्यापारावर होत असलेले मॉल्स् कंपन्याचे वर्चस्व खुल्या मुक्त बाजारपेठेचे अत्यावश्यक क्षेत्रातील पदार्पण यामुळे भारतात आरोग्य अरिष्टाचे रुपांतर अन्न अरिष्टात होईल. म्हणून अन्न सुरक्षेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संघटनानी एकजुटीने काही ठोस बाबी पुढे आणल्या पाहिजेत. जन चळवळीच्या रेट्याने त्याचे राजकीय लढ्यात रुपांतर करावे लागेल.

भारतात आजच्या परिस्थितीत सार्वजनिक वितरण व्यवस्था ही सक्षम केली पाहिजे. अन्न सुरक्षा कायदा २०१३ यातील त्रुटी दुर केल्या पाहिजेत. गरजवंतास रेशन, युनिर्व्हसल रेशन सिस्टीम, फुड फॉर ऑल या स्लोगनवर जनता संघटीत करावी लागेल. रेशनवर गहु-तांदुळा बरोबर डाळ-खाद्यतेल-साखर-मीठ-चहापुड-खोबरेल तेल-अंगाचा साबण-कपड्याचा साबण-डिटर्जंट पावडर ज्या त्या राज्यातील खाद्य संस्कृतीनुसार काही मसाल्याचे पदार्थ मिळतील याची मागणी पुढे यायला हवी. या मागण्या कायदेशीर तरतूदींच्या स्वरूपात अन्न सुरक्षेच्या कायद्यात समाविष्ट व्हायला हव्यात.

अन्न सुरक्षा कायदा २०१३ लागू करताना या कायद्याने ज्या वस्तु नियंत्रित व्यापारात आल्या त्यांचे वितरणाच्या साखळीचे नियंत्रण सार्वजनिक उद्योग- सरकारी उद्योग म्हणून करावे लागेल. वितरण व्यवस्थेतील महत्त्वाचा घटक रेशन दुकानदार हे खासगी व्यावसाईक असता कामा नये. हमाल-मापाडी-वितरण व्यवस्था याचे नियंत्रण शासकीय यंत्रणेचाच भाग पाहिजे. याबाबत रेशन चळवळीने आग्रही राहिले पाहिजे.

राज्यकर्त्याचे आर्थिक धोरण एक असल्यामुळे सत्तेवर असलेले, सत्तेवर येऊ इच्छिणारे यांची रेशन प्रश्नाकडे पाहण्याची दृष्टी समान आहे. डी.बी.टी. (डायरेक्ट बेनीफिट ट्रान्सफरेशन) बाबत संसदेच्या दोन्ही सभागृहात अगर राज्य सरकारच्या दोन्ही सभागृहात फार गंभीर चर्चा झाली नाही. कोरोना आपत्तीच्या काळात सुध्दा केन्द्र व राज्याच्या समन्वय नसल्यामुळे घोषीत झालेली डाळ अद्याप लाभार्थ्यास मिळालेली नाही. त्याची गंभीर दखल राज्यकर्ते व विरोधी पक्ष घेत नाहीत. आपणांस जन चळवळीच्या आधारावरच राज्यकर्त्याना भुमिका घेण्यास भाग पाडल्याशिवाय पर्याय नाही. कारण अन्न सुरक्षा सार्वजनिक वितरण व्यवस्था सक्षम करणे, अन्न सुरक्षा कायदा २०१३ सक्षम करणे हे आपल्यासमोर आव्हान आहे. ■

**चंद्रकांत यादव**
रेशन बचाव समितीचे प्रवक्ते
रेशन दुकानदार संघटने राज्य सेक्रेटरी
९३७१६२९४९६
ई-मेल - reshanbachavsamiti@gmail.com

## संजय शिंदे

**» कोविड १९ नंतर ग्रामीण भागात येणारे आर्थिक संकट व त्यापासून निर्माण होणाऱ्या विविध समस्यावर मात करण्यासाठी मनरेगा उत्तम पर्याय आहे. कारण यापुर्वी महाराष्ट्राला या योजनेने तारलेले आहे. जगातील सर्वात मोठी रोजगारक्षम योजना अशी मनरेगाची ओळख आहे. कोरोनाच्या आपत्तीतूनही निर्माण झालेल्या परिस्थितीत गरीबांना भुकेच्या समस्येवर एक सन्मानजनक मार्ग ही योजना आजही दाखवत आहे...**

▶ कोविड-१९ या व्हायरसने जगात थैमान घातलेले आहे. त्यामुळे जग जागच्या जागी थांबलेले आहे. विषेशत: या रोगाची भिती मनुष्य जातीला आहे. मनुष्य जात आपला संपुर्ण व्यवहार बंद करुन घरात बसलेली आहे. त्यामुळे अर्थव्यवस्था कोलमडण्याची भिती निर्माण झाली आहे. आपला देश तर मागील दोन वर्षापासून आर्थिक मंदीत सापडलेला आहे. तसेच ग्रामिण अर्थव्यवस्था तर निसर्गचा लहरीपणा आणि शासनाचे शेती विषयी दुट्प्पी भुमिका व धोरण यामुळे पुर्णपणे ढासळलेली आहे. त्यातच या महामारीने कहर केला आहे. तसेच ही महामारी संपल्यानंतर जी परिस्थीती निर्माण होणार आहे त्याला तोंड देणे सोपे नाही. सर्वात मोठा परिणाम ग्रामीण भागात दिसणार आहे.

आपल्या एकूण लोकसंख्येच्या ५४ ट्क्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. यामधील जवळपास २० टक्के शेतकरी व शेतमजूर आजही अर्धपोटी झोपतात. त्यामुळे शेतीवर मोठा भार देता येणार नाही. तसेच आज अर्धपोटी झोपणारे कुटूंब यांची इतर ठिकाणी व्यवस्था करणे आवश्यक आहे. पण या महामारीने यांची इतर ठिकाणी व्यवस्था करणे तर सोडा आज शहरातून मजूरांचे लोंढे खेड्यात आलेले आहेत. अगोदरच शेतीचे अर्थकारण बिघडल्याने खेड्यात आत्महत्यांचे प्रमाण वाढलेले आहे. त्यात शहरातून आलेल्या जवळपास २५ ट्क्के मजुरांमुळे दुष्काळात तेरावा महिना अशी गत ग्रामीण भागाची झाली आहे. यामधे मराठवाडा, विदर्भ आणि इतर दुष्काळी



# मनरेगाला साथ आपत्तीवर मात

जिल्ह्यात मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. या भागात मजुरीची अपुर्ण संधी असल्याने हंगामी मजुरीसाठी स्थालांतरीत होतात आणि त्यात कायम स्थलांतरीत झालेला मजुर परत गावी आला आहे. विशेषत: बीड, उस्मानबाद आणि जालना जिल्ह्यात ही मोठी समस्या निर्माण होणार आहे. आपण या सर्वांना काम देणे, अन्नधान्य, मुलभूत सेवा सुविधा पुरविण्यात कमी पडूलोत किंवा लवकर देवू शकलो नाहीत तर भुकबळी, कुपोषण, आत्महत्या व गुन्हेगारीत वाढ होईल. ही परिस्थिती लवकर आटोक्यात आली नाही तर आणखी सामस्यांत वाढ होईल आणि जे मृत्युंचे प्रमाण महारोगाने दिसले नाही ते त्याच्या परिणामाने दिसेल.

त्यावर उपाय योजना राबविण्यासाठी प्रत्येक गावात किती कुटुंब आलेले आहेत त्यांचा सर्वे करुन त्यातील शहरात परत न जाणाऱ्या कुटुंबाची संख्या वेगळी करावी लागेल. या लोकांना व गावातील गरजू मजुरांना महात्मा गांधी रोजगार हमी योजनेची कामे तात्काळ सरू करून द्यावीत. त्यासाठी शासनाने सामाजिक संस्थांची मदत घ्यावी. आज या लढ्यात शासन एकटे कमी पडेल त्यासाठी सामाजिक संस्थानां सोबत घेवून काम केले किंवा त्यांच्यावार जबाबदारी दिली तर आपण नक्कीच जिंकू. हा उपाय कायम स्वरुपी नाही पण यातून गावा गावातून ४० ट्क्के मजूर दोन वर्ष जगवू शकतो.

आपल्या महाराष्ट्राचा इतिहास पाहिला तर आपत्ती काळात रोजगार हमी योजनेने मोठे सहकार्य केलेले आहे. आजही तीच वेळ आपल्यावर आलेली आहे. आजची रोजगार हमी योजना राबविणे अवघड वाटत असली तरी त्यात बदल करण्याची गरज नाही. कारण ही अवघड आहे, असे भासवण्याचे काम संबधीत शासकीय खाबूबाबूने केलेले आहे आणि त्यास सहकार्य गुत्तेदार यांचे आहे. आम्ही सन २०१५-१६ च्या दुष्काळात ही योजना राबविलेली आहे. त्यातील काही अनुभव आपल्याला सांगतो, मजुरांचे जॉब कार्ड काढण्यापासून ते मजुरांचे पगार काढ्ण्या पर्यंत गावच्या संबधीत कर्मचाऱ्यांपासुन तालुक्याचे कर्मचारी, गुत्तेदार व लोक प्रतिनिधी यांचा विरोध झाला. पण यांना न जुमानता आम्ही काम केले व या लोकांची मक्तेदारी मोडित काढली. आजही गावागावत मजुरांना त्यांचे जॉब कार्ड कोणी काढूलेले आहे ते माहित नाही. तसेच गुत्तेदारांनी त्यांचे खाते काढून जॉब कार्ड स्वता:कडेच ठेवलेले आहेत. अशाप्रकारे या कार्डांच्या आधारे हजारो रुपये व्यवहार केलेला आहे. ही वेळ काय भ्रष्टाचार उकरुन काढण्याची नाही पण आपल्याला माहित असावे म्हणून उल्लेख केलेला आहे.

शासनाने हा मनरेगा कायदा प्रभावी रबविला तर ग्रामीण भागातील रोजागाराची मोठी समस्या दुर होईल. यामधे विशेष करून शेतीचे कामे, मृद व जलसंधारण कामे घ्यावीत म्हणजे रोजगारा सोबतच पाणी साठ्यात वाढ होवून शेतीचे उत्पादन वाढेल. भुकबळी, कुपोषण, आत्महत्या, गुन्हेगारी व मजुरीसाठीचे होणारे स्थलांतर थांबेल. या कामासाठी ग्रामीण भागात काम करणाऱ्या संस्थानी स्वत: होवून पुढे यावे आणि आपत्तीवर मात करावी. ■

**संजय ज्ञानोबा शिंदे**
सचिव - हिंद संस्था नेकनूर, ता. जिल्हा बीड.
९८५०५२३९६९



# कुपोषण संपविण्यासाठी

रमेश पाध्ये

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर कुपोषण खाद्यान्नांची गरज याबाबत जेष्ठ तज्ज्ञ संशोधक रमेश पाध्ये यांचे चिंतन..



आपल्या देशात लोकांच्या उत्पन्नापेक्षा अन्नधान्याच्या किंमती जास्त असणे ही एक गंभीर समस्या आहे .अन्नधान्याच्या किंमती चढल्या असल्यामुळे लोकांना बाजारातून पुरेसे अन्नधान्य खरेदी करता येत नाही .परिणामी देशातील सुमारे ४०%लोकांना कुपोषित रहावे लागते.

सर्वसाधारण पताळीवर लोकांना पुरेशा प्रमाणात पिष्टमय पदार्थ मिळतात परंतु प्रथिने आणि खनिजद्रव्ये व जीवनसत्वे लोकांना पुरेशा प्रमाणात मिळत माही असे दिसते . भारतातील गरीब लोकांसाठी प्रथिनांचा पुरवठा करणारा प्रमुख स्त्रोत म्हणजे कडधान्य हा होय. अशा कडधान्याचे उत्पादन आपल्या देशात पुरेशा प्रमाणात होत नाही. त्यामुळे आपण वर्षाला सुमारे पाच दशलक्ष टन एवढी कडधान्य आयात करतो. परंतु असे केल्या नंतरही लोकांना पुरेशा प्रमाणात प्रथिनांचा पुरवठा होईल एवढ्या प्रमाणात कडधान्य उपलब्ध होत नाहीत. सर्वात कमी खर्चात प्रथिने उपलब्ध करून देणारे कडधान्ये लोकांना परवडत नाहीत तर मांस, पनीर, यासारखे प्रथिनांचा पुरवठा करणारे प्राणिजन्य पदार्थ देशातील गोरगरीब लोकांना परवडणे असंभवनिय आहे. त्यामुळे देशातील कुपोषणाची समस्या निकालात काढायची असेल तर खाद्यान्नांच्या किमती लक्षणीय प्रमाणात कमी होणे गरजेचे आहे.

खाद्यान्नांच्या किमती कमी करण्याची क्रिया दोन मार्गांनी साध्य करता येऊ शकेल. त्यातील पहिला मार्ग म्हणजे सरकारने अनुदान देऊन अन्नधान्य स्वस्त दराने लोकांना उपलब्ध करून देणे हा होय. सध्या सार्वजनिक वितरण व्यवस्थे मार्फत सामाजातील सुमारे ६७ टक्के लोकांना असे स्वस्थ धान्य पुरवण्यात येते. सरकारच्या या योजनेला किती गळती लागली आहे हे सर्वांना ज्ञात आहे. त्यामुळे ही गळती थांबवण्यासाठी डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर योजना राबवावी आणि सार्वजनिक वितरण व्यवस्था बंद करावी अशा स्वरूपाचा उपाय सध्या सुरू आहे. परंतु वास्तवात लोकांना परवडणाऱ्या दरात खाद्यान्न उपलब्ध करून द्यायचे असेल तर खाद्यान्नाच्या उत्पादन खर्चात लक्षणीय प्रमाणात कपात करणे गरजेचे ठरणार आहे. अन्न धान्याच्या उत्पादन खर्चात लक्षणीय प्रमाणात कपात करणे ही सापेक्षतः सहजपणे साध्य करता येणारी बाब आहे. उदारणार्थ, शेतीला सिंचनाची जोड उपलब्ध करून दिली तर कोरडवाहू शेतीची उत्पादकता दुप्पट होईल आणि शेतीचे दर हेक्टरी उत्पादन आहे त्याच्या दुप्पट होईल. धान्य उत्पादनाच्या उत्पादकतेत अशी वाढ झाली की शेतकऱ्यांना खुल्या बाजारात आजच्यापेक्षा स्वस्त दराने धान्याची विक्री करणे शक्य होईल. आणि अशी बदलाची प्रक्रिया जोर धरू लागेल तेव्हाच देशातील कुपोषणाची समस्या निकालात निघेल.

पन्नास वर्षापूर्वी, म्हणजे हरितक्रांतीचा पुरेशा प्रमाणात विस्तार होण्यापूर्वी आपल्या देशातील धान्याचे प्रमुख पीक ज्वारी हेच होते. १९६५ व १९६६ या दोन पाठोपाठच्या दुष्काळी वर्षामूळे गर्भगळीत झालेल्या राज्यकर्त्यांनी परदेशातून गहू आणि तांदूळ या धान्याची अधिक उत्पादक वाणे आणून देशातील धान्याची टंचाई निकालात काढण्याचा मार्ग निवडला. या मार्गावरून वाटचाल केल्यामुळे धान्य उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. परंतु त्याचवेळी रासायनिक खते आणि किटाणूनाशके यांच्या मागणीत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. तसेच तांदूळ आणि गहू या धान्याच्या उत्पादनासाठी ज्वारीच्या अनेक पट पाणी लागत असल्यामुळे धान्य उत्पादनासाठी पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला. देशातील लोकसंख्येत वाढ झाल्यामुळे दरडोई



पाण्याच्या उपलब्धतेत घट येत असताना शेतीमध्ये पाण्याच्या वापरात वाढ झाल्यामुळे औद्योगिक आणि घरघुती वापरासाठी पुरेसे पाणी मिळणे दुरापास्त ठरू लागले.

पूर्वी ज्वारी वा बाजरी यासारखी पौष्टिक धान्ये लोकांच्या आहाराचा भाग होती. त्याऐवजी आता गहू वा तांदूळ अशी कमी दर्जाची धान्यें आज आपल्या आहाराचा भाग बनली आहेत. आपल्याला कुपोषण समाप्त करायचे असेल तर लोकांच्या आहारात ज्वारी वा बाजरी यासारख्या पौष्टिक धान्याचा समावेश होणे गरजेचे आहे. परंतु आज चांगल्या दर्जाच्या ज्वारीच्या पिठासाठी किलोला सत्तर रुपये मोजावे लागतात. त्यामुळे देशातील गोरगरीब लोकांना ज्वारी खाणे परवडत नाही. याच्याउलट साधारण प्रतवारीच्या गव्हाचे पीठ पस्तीस ते चाळीस रुपये किलो दराने बाजारात उपलब्ध असलेले दिसते. त्यामुळे देशातील गोरगरीब लोक गव्हाच्या चपात्या खाऊन आपला गुजारा करतात. गोरगरीब लोकांमधील कुपोषण संपावायचे असेल आणि शेतीसाठी लागणाऱ्या पाण्यात बचत करायची असेल तर लोकांना गव्हापेक्षा कमी दरात ज्वारी उपलब्ध करून देणे गरजेचे ठरणार आहे. तसे करायचे तर ज्वारी या पिकाची उत्पादकता लक्षणीय प्रमाणात वाढवायला हवी. अशा बदलासाठी उपयुक्त ठरणारे ज्वारीचे वाण हैद्राबाद येथील 'इक्रिसॅट' या संस्थेकडे उपलब्ध आहे. सदर वाणाची लागवड केल्यास ज्वारीच्या पिकाची काढणी सुमारे सहा महिन्यांनी करता येते. या ज्वारीचे कणीस १८ इंचा पेक्षा जास्त लांबीचे असते आणि ज्वारीच्या दाण्याचे हेक्टरी उत्पादन सुमारे दहा टन एकढे प्रचंड भरते. अर्थात ज्वारीच्या अशा पिकासाठी सहा महिनेचा कालखंड लागत असल्यामुळे ज्वारीच्या या वानासाठी सिंचनाची सुविधा अनिवार्य ठरते. त्यामुळे देशातील भरमसाठ पाऊस कोसळणारे मोजके जिल्हे वगळता इतरत्र सर्व जिल्ह्यांमध्ये खरीप हंगामात या ज्वारीच्या वाणाचा पेरा करून डिसेंम्बर महिन्याच्या अखेरीस ज्वारीची काढणी करणे योग्य ठरेल. या सहा महिन्याच्या काळात पहिल्या चार महिन्यात दोन पाउसामधील अंतर प्रमाणाबाहेर वाढल्यास संरक्षक सिंचनाची ७५ मिलिमीटरची एक पाळी देणे पुरेसे ठरेल. तसेच पुढील दोन महिन्यात साधारणपणे दर तीन आठवड्याने ७५ मिलीमीटर सिंचनाच्या तीन पाळ्या द्याव्या लागतील. सिंचनाची अशी चोख व्यवस्था केल्यास हेक्टरी दहा टन ज्वारीचे दाणे आणि सुमारे ५० टन कडबा असे एकूण उत्पादन मिळेल.ज्वारी या पिकाचा कडबा हा चांगल्या दर्जाचा चारा असल्यामुळे शेतकऱ्यांना ज्वारीचे पीक घेतल्यास दूध उत्पादन व्यवसायाची भरभराट होईल. अशा रीतीने ज्वारीच्या पिकांमुळे अन्न सुरक्षा तर प्रस्थापित होईलच, पण त्याचबरोबर जनावरांच्या चाऱ्याची समस्या निकालात निघेल आणि त्यामुळे पशुपालन व्यवसायाला चालना मिळेल.

ज्वारीचे हेक्टरी १० टन उत्पादन मिळू लागले की शेतकऱ्यांना अशी ज्वारी किलोला १० रुपये दराने ग्राहकांना उपलब्ध करून देणे परवडेल. बाजारात अश्या स्वस्त दराने धान्य मिळू लागेल तेव्हाच कुपोषणाच्या समस्येचा अंत जवळ येईल. देशात तांदूळ आणि गहू या अधिक पाणी लागणाऱ्या पिकांऐवजी सर्वात कमी पाणी लागणाऱ्या पीकाकडे आपण वळू तेव्हाच कडधान्य आणि तेल बिया या पिकांच्या उत्पादनासाठी लागणारे पाणी पुरेशा प्रमाणात उपलब्ध होईल. तसेच भाज्या व फळे अशा कृषी उत्पादनासाठी लागणारे पाणी देखील शेतकऱ्यांना उपलब्ध करून देता येईल. आरोग्यदायी जीवनासाठी आहारात पिष्टमय पदार्थांबरोबर प्रथिने, खनिजद्रव्य आणि जीवन सत्वे पुरवणाऱ्या खाद्यान्नांचा समावेश होणे गरजे ठरते. अशा सर्व घटकांचा पुरेशा प्रमाणात पुरवठा होण्यासाठी माणसाला दररोज सुमारे ४५ ग्राम पिष्टमय पदार्थ, १५ ग्रॅम कडधान्य, अर्धा लिटर दुध, १ वाटी पालेभाजी, दोन वाट्या फळभाज्या आणि एखादी केळी यांचा दैनंदिन आहारात समावेश व्हायला हवा .

भारतातील सर्व नागरिकांना पुरेशा प्रमाणात चौरस आहार उपलब्ध व्हावा ही गोष्ट कोणत्याही राजकीय पक्षाच्या कार्यक्रम पत्रिकेवर आज नोंदवली गेलेली नाही. हीच मोठी चिंतेची बाब आहे. लोकांना पुरेशा प्रमाणात चौरस आहार उपलब्ध करून द्यायचा असेल तर खाद्यान्नाच्या किमती ग्राहकांच्या आवाक्यात राहण्यासाठी सरकारने युद्ध पातळीवर प्रयत्न करणे गरजेचे ठरेल. ■





# आभाळ फाटलंय..
# ठिगळ लावणार तरी कुठे कुठे...

**विनायक लष्कर**

**भारतात १५ कोटी लोक भटके-विमुक्त या प्रवर्गात आहेत. रेणके आयोगानुसार या प्रवर्गात जवळपास १००० पेक्षा अधिक जमातींचा समावेश आहे. यापैकी ९० टक्के जमाती भूमिहीन आहेत. ८० टक्के लोकांकडे रेशनकार्ड नाहीत, जवळपास ९० टक्के लोकांना कोणत्याही प्रकारचे बँकेचे अर्थसहाय्य मिळालेले नाही. आजही या जमातीतील ७० टक्के लोक बेघर आहेत, बरेचसे लोक पालांवर व झोपडपट्ट्यांमध्ये वास्तव्य करतात. अशा लोकांवर लॉकडाऊनमुळे आलेल्या परिस्थितीत पोहोचवलेल्या मदतीबद्दल सांगताहेत प्रा. विनायक लष्कर...**

२५ मार्च रोजी टाळेबंदी करण्यात आली. या काळात सर्वात जास्त फटका बसणार होता तो म्हणजे सर्वसामान्य कष्टकरी जनतेला. रोजंदारीवर उदरनिर्वाह करणाऱ्यांना, आणि हातावर पोट असणाऱ्या माणसांना . या सर्व नागरी भागामध्ये स्थलांतरीत असंघटीत आणि रोजंदारी करून निर्वाह करणाऱ्यांमध्ये जर सर्वात जास्त प्रमाण कुणाचे असेल तर ते म्हणजे विमुक्त आणि भटक्या जमातींचे. या जमातीमध्ये साधारणतः बांधकाम क्षेत्रामध्ये मजूर म्हणून काम करणारे वडार जमातीचे लोक, भिक्षुकी आणि बहुरूपी करणारे नाथपंथी डबरी गोसावी, दोरीवरचा खेळ करणारे डोंबारी किंवा गोपाळ, नाग-सापाचा खेळ करणारे मदारी, माकडाचा खेळ करणारे मदारी, लोखंडाची अवजारे तयार करणारे लोहार, डोक्यावर देव्हारा घेवून फिरणारे मरीआईवाले, जुन्या कपड्यांचा विक्री करणारे काशी-कापडी, जुन्या वस्तूंची विक्री करणारे छप्पर बंद, केसांवर भांडी विकणारे गोसावी, भंगार गोळा करणारे गोसावी या सर्वांचा समावेश आहे. एकूणच आजही जातीवर आधारित व्यवसाय करून उदरनिर्वाह करणाऱ्यांना या टाळेबंदीचा फटका अधिक बसणार होता. टाळेबंदीमुळे कुणालाही घराबाहेर पडता येणार नव्हते. काही स्थलांतरीत भटक्यांनी आपल्या मुळ गावी परतण्याचा निर्णय घेतला, तर काही भटक्यांना स्थलांतरीत ठिकाणीच स्थानबद्ध होण्याची वेळ आली. परंतु दोघांचीही उपासमार होणार किंवा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होणार हे तर निश्चितच होते.

या संकटाशी दोन हात करण्याचा निर्णय 'भटके विमुक्त युवा परिषदे'च्या महाराष्ट्रातील सर्व कार्यकर्त्यांनी घेतला. आम्ही सर्वांनी फोनवरून एकमेकांशी चर्चा करून आपापल्या भागातील भटक्या-विमुक्तांची सद्यस्थिती जाणून घेऊन एकमेकांना कळविण्याचा निर्णय एकमताने घेतला. यानंतर सर्वात मोठे आव्हान होते आर्थिक निधी उपलब्ध करण्याचे. कारण आमच्या संघटनेला कुणाचेही आणि कोणतेही आर्थिक पाठबळ नाही. यानंतर आव्हान होते घराबाहेर पडून जिल्ह्याच्या सीमा पार करण्याचे. काही काळ हताश आणि हतबल झाल्यासारखे वाटू लागले. परंतु आम्ही कुणीही खचून गेलो नाही. गेल्या पंधरा वर्षापासून भटक्या-विमुक्तांच्या प्रश्नांच्या अनुषंगाने चळवळीत काम करत असल्याने संपूर्ण भारतभर अनेक मित्र, संघटना,



हितचिंतक, अधिकारी, सामजिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था, राजकीय क्षेत्रातील व्यक्ती आणि महत्वाचे म्हणजे मानवी संवेदना जागृत असणाऱ्या असंख्य व्यक्ती यांच्याशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झालेले होते. या सर्वांची जमेल तसे मदत घेण्याचे ठरले आणि कामाला सुरवात झाली.

लॉकडाऊन घोषित होण्यापूर्वी दोन दिवस आधी पुण्यातील शिवाजीनगर या परिसरामध्ये असणाऱ्या वडारवाडी या भागात गॅस सिलेंडरचा स्फोट होऊन आगीने जवळपास ५० ते ५५ घरे जळून राख झाली होती. या वडारवाडीमध्ये अनेक भटक्या विमुक्त जमातीतील व्यक्तींचे वास्तव्य आहे. या लोकांना मदतीची गरज आहे, अशा आशयाची पोस्ट २० मार्च रोजी मी माझ्या फेसबुक लिहिली. या आगीमध्ये ज्यांची घरे जळाली त्या लोकांना निवाऱ्यासाठी नजीकच्याच एका शाळेमध्ये ठेवण्यात आले होते. 'त्यांच्या जेवणाचा प्रश्न निर्माण झाला आहे!' असा निरोप आम आदमी पक्षाचे पुणे शहराध्यक्ष, व आमचे मित्र मार्गदर्शक मुकुंद किर्दत यांना कळविला. यानंतर वडारवाडीतील काही स्थानिक मित्रांशी या संदर्भात बोलणे झाले. महेंद्र पवार यांनी काही दिवसांची यांची सोय झाली आहे असे सांगितले. परंतु खरा प्रश्न होता नंतरच्या काळातला. कारण यानंतरच लॉकडाऊनची घोषणा करण्यात आली. आम्हालाही तत्काळ मदतीसाठी बाहेर पडता येणे शक्य नव्हते. यानंतर आमचे मित्र लोकायत संस्थेचे कार्यकर्ते जितु यांना फोन करून काय परिस्थिती आहे, याची सविस्तर माहिती घेतली. त्यांनीही मदतीची आवश्यकता आहे असेच सांगितले. दरम्यानच्या काळामध्ये बारामतीचे प्रसिद्ध उद्योजक गुरुप्रसादजी आगवणे यांनी पीडीताना तत्काळ मदत करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांनी १०००० रु. माझ्याकडे देऊ केले व मला सांगितले, ''तुम्हाला आवश्यक वाटेल ती मदत या पीडितांना करा.' दरम्यान दिल्लीतील आमचे मित्र सुप्रीम कोर्टातील वकील ॲड. दिनेश राजभर यांनी या पीडितांना मदत मिळवून देण्यासाठी महाराष्टातील मानवी हक्क आयोगाकडे तक्रार देखील दाखल केली. हे सर्व दूरगामी न्याय मिळवून देण्याच्या दिशेने घडत होते. परंतु प्रश्न होता या पिडीतांना लॉकडाऊनच्या कालावधी मध्ये आहार पुरविण्याचा. स्थानिक राजकीय पुढारी आणि स्वयंसेवी संस्थांनी काही दिवस मदत केलीही. परंतु जसजसा लॉकडाऊनचा कालावधी वाढू लागला तसतसा या जमातींच्या भुकेच्या प्रश्नाने देखील व्यापक स्वरूप धारण करायला सुरवात केली. दरम्यानच्या कालावधीत भटके विमुक्त युवा,परिषदेचे सचिव मा. संदीप आखाडे यांचे बार्टी या संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेतील संशोधन प्रकल्प अधिकारी मा.आरती डोळस यांच्याशी बोलणे झाले. संदीप आखाडे यांनी माझा संपर्क डोळस यांना देवून मला संपर्क करायला सांगितले. त्यांनी तात्काळ संपर्क करून पूर्ण माहिती घेतली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सर्व कुटुंबाना रोज दोन वेळच्या जेवणाची सोय संस्थेमार्फत करता येईल असे त्यांनी सांगितले. लॉकडाऊनमुळे स्वतःला घराबाहेर पडता येणे शक्य नसल्याने मी आमचे वडारवाडी मुधील  मित्र जितु यांचा संपर्क आरती डोळस यांना दिला आणि त्यांना त्यांच्याशी बोलून निर्णय घेनायो सुचविले. दुसऱ्या दिवशी पासून या सर्वांच्या जेवणाची सोय बार्टी संस्थेने केली. मी डोळस यांना धन्यवाद देण्यासाठी फोन केला तर त्या म्हणाल्या, ''विनायक काळजी करू नको, लॉकडाऊन १४ तारखेपर्यंत आहे तोपर्यंत त्यांना जेवण मिळेल.'फ मला खूप बर वाटलं.

यानंतरच्या काळात लॉकडाऊनची आणि भटक्या विमुक्तांचे प्रश्न यांची तीव्रता वाढतच गेली. या संदर्भात सातत्याने फेसबुक वर लिहीत असल्याने आमचे मित्र व मार्गदर्शक रवींद्र झेंडे यांनी सरकारला निवेदन देऊन प्रश्न सोडविण्याच्या संदर्भात सरकारशी पत्रव्यवहार करण्याचे सुचविले. तात्काळ भटक्या - विमुक्त युवा परिषदेच्या सर्व कार्यकर्त्यांशी बोलून शासनाला निवेदन देण्याचा निर्णय घेतला. या निवेदना संदर्भात आम्हाला भटक्या-विमुक्त प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने मदत करणारे आमचे मित्र व मार्गदर्शक प्रा. सुभाष वारे, सन्माननीय बाबा आढाव, प्राध्यापक हेरंब कुलकर्णी, डॉ. विश्वंभर चौधरी, कॉ. लता भिसे- सोनवणे, संपादक रवींद्र आंबेकर, डॉ. मिलिंद बोकील, किरण मोघे, डॉ मनीषा गुप्ते, डॉ. रमेश अवस्थी, सूनिति सु.र., वैशाली भांडवलकर, अरुण लावंड, दिनानाथ वाघमारे आणि रवींद्र झेंडे या सर्वांचा सल्ला आणि पाठिंबा देखील घेण्यात आला. निवेदनासाठी आवश्यक असणाऱ्या



महत्त्वाच्या सूचना देखील या सर्व व्यक्तींनी केल्या. सर्व सूचनांच्या आधारे लॉकडाऊनच्या परिस्थितीत भटके विमुक्त जमातींचे हाल होऊ नये म्हणून निवेदन तयार करण्यात आले. सदर निवेदनाची दखल घेत मा. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सामाजिक न्याय विभागाचे सचिव यांना आवश्यक त्या सूचनाही दिल्या. यामध्ये प्रामुख्याने भटक्या-विमुक्तांच्या भुकेच्या संदर्भात काही मौलिक सूचना करण्यात आल्या होत्या. ज्यामध्ये मोफत रेशन आणि ज्यांच्याकडे राशनकार्ड नाही अशा सर्व भटक्या-विमुक्तांना देखील मोफत धान्याचा पुरवठा लॉकडाऊनच्या कालावधीत करण्यात यावा हे निवेदन सरकारला ३० मार्च रोजी देण्यात आले. यानंतर महाराष्ट्र सरकारमुधील विविध खात्याच्या मंत्र्यांना देखील हे निवेदन पाठविण्यात आले.

यानंतर भटके-विमुक्त युवा परिषदेच्या उपाध्यक्ष मा. शैला यादव यांनी ३० मार्च रोजी फलटणमध्ये लॉकडाऊनमुळे स्थानबद्ध झालेल्या भटक्या-विमुक्त जमातीतील नाथपंथी, डवरी, गोसावी जमातीतील लोकांची माहिती दिली. या लोकांना तत्काळ संपर्क साधण्यात आला. त्यांच्या परिस्थिती विषयी सविस्तर जाणून घेण्यात आले. या जमातीतील तानाजी शिंदे यांनी असे सांगितले, ''फलटणमध्ये आम्ही जवळपास ३०-४० लोक अडकून पडलो आहोत. आम्ही मुळचे पाटस तालुका दौंड या ठिकाणचे रहिवासी आहोत. परंतु पोट भरण्यासाठी फलटणमध्ये राहत आहोत. सध्या आम्हाला बाहेर कुठेही फिरता येत नाही. आम्ही ज्या ठिकाणी राहतो त्या ठिकाणी सध्या अवकाळी पावसामुळे आमच्या पालांभोवती भरपूर पाणी साचले आहे. आमची निवाऱ्याची आणि जेवणाची काही सोय या ठिकाणी उपलब्ध नाही. आम्हाला काही मदत करता आली तर बघा!'' मी तात्काळ सदर परस्थितीचे वर्णन करणारी पोस्ट आणि संबंधित व्यक्तीने मदतीसाठी तयार केलेला व्हिडीओ फेसबुकवर टाकला. आणि फलटणमधील स्थानिकांना मदतीचे आवाहन केले. त्यानंतर लागलीच अनेक स्थानिक मंडळी, व्यावसायिक व कार्यकर्त्यांचे फोन यायला सुरवात झाली. लातूर, सातारा, दौंड आणि पुणे परिसरातील अनेकांनी फोन करून मदतीची इच्छा दर्शविली. काही व्यापारी मंडळींनी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांचेही फोन आले. भटके विमुक्त युवा परिषदेचे बीड मुधील संघटक मा. अशोक हतागळे या मित्राने ३ एप्रिल रोजी आपल्या एकलव्य मदत गटाच्या माध्यमातून जवळपास १०-१२ दिवस पुरेल एवढा किरणा पोहोचवला. यानंतर स्थानिक कार्यकर्ते आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सदर व्यक्तींची राहण्याची सोय देखील केली. फलटणमधून तानाजी शिंदेंचा आभारादाखल फोनही झाला.

दुसऱ्या दिवशी पुन्हा तानाजी शिंदेंचा पुन्हा फोन आला. त्यांचेच काही बांधव बाभूळगाव दुमाला ता. कर्जत जि.अहमदनगर या ठिकाणी वास्तव्यास असल्याचे त्यांनी कळविले. 'ते काय काम करतात?' असे विचारल्यावर तानाजी म्हणाले, ''हे लोक मुळचे याच गावचे रहिवासी आहेत व गावामध्ये भिक्षा मागून उदरनिर्वाह करतात.'' या ठिकाणी जवळपास ३५-४० लोक वास्तव्य करीत असल्याचे देखील त्यांनी सांगितले. परंतु सध्याच्या काळात या लोकांना भिक्षा मागण्यासाठी घराबाहेर पडता येत नसल्याने त्यांचे जेवणाचे खूपच हाल होत आहेत असेही ते म्हणाले. मी तात्काळ संबंधीत गावामध्ये राहणाऱ्या या जमातीतील एका व्यक्तीशी बोलून सर्व परस्थितीची माहिती घेतली. सदर परस्थितीचे कथन करणारी पोस्ट मी ४ एप्रिल रोजी फेसबुकवर लिहिली. आणि हीच माहिती मी माझ्या मित्र यादीतील व्हॉटसॲप वर देखील वेगवेगळ्या गटात पाठविली. याची दखल घेत अशोक हातगळे या मित्राने त्याच्या संपर्कातील राशीन ता.कर्जत मधील महिला बचत गटाला मदत करण्याचे आवाहन केले. या आवाहनाला प्रतिसाद म्हणून क्षणाचाही विलंब न लावता राशीन मधील मुस्लीम बांधवानी 'सहारा महिला बचत गटा'च्या माध्यमातून अन्नधान्याची आणि किराणा मालाची मोलाची मदत या भटक्या जमातीतील लोकांना केली गेली. यानंतर मी सहारा महिला बचत गटाचे सहकारी व मार्गदर्शक जमीर काजी यांना आभार मानण्यासाठी फोन केला तर त्यांनी आणखी काही मदत लागली तर कळवा म्हणून पुन्हा एकदा मदतीचा आणि सहकार्याचा हात पुढे केला. थोडक्यात आजही माणुसकी हाच धर्म इतर कुठल्याही मानव निर्मित धर्मापेक्षा किती श्रेष्ठ आहे याचेच हे जिवंत दाखला देणारे अनुभव ठरत होते.

त्यानंतर प्रकाश सावंत यांनी पाटस या ठिकाणी काही (ता.दौंड जि.पुणे ) बहुरूपींचा व्यवसाय करून उदरनिर्वाह करणाऱ्या भटक्या जमातीची माहिती दिली. सावंत यांच्याकडून या ठिकाणच्या एका स्थानिक व्यक्तीचा फोन नंबर मागून घेतला. या व्यक्तीला संपर्क केला असता त्याने सांगितले कि, ''आम्ही मुळचे या गावामध्येच वास्तव्य करणारे लोक आहोत. बहुरूप्याचं सोंग घेऊन दारोदार, गावोगाव आम्ही पोटपाण्यासाठी फिरत अस्तु. आता या आजारामुळे आम्हाला बाहेर पडता येत नाही. फारकाही पैसे देखील आम्ही साठवून ठेवलेले नाहीत. त्यामुळे आमचं हाल व्हत्यात. आम्ही कच - बच खाऊन कसे बी दिवस काढू पण आमच्या बारक्या बारक्या लेकरांनी काय करायचं? तुम्ही चांगली मांणस हायती आम्हाला थोडीसी मदत करा'' हे सगळ ऐकल्यानंतर मी नेहमीप्रमाणे सर्व परस्थितीचे वर्णन करणारी पोस्ट माझ्या फेसबुकवर लिहिली. या आवाहनाला प्रतिसाद म्हणून पुण्यातील आय-सिड फौंडेशनचे विष्णू शिंदे यांनी तात्काळ मदतीचा फोन केला. त्यांच्याजवळ जवळपास १० कुटुंबाना पुरेल एवढा किराणा उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. परंतु लॉकडाऊनमुळे पुण्याहून हा किरणा घेऊन पाटसला जाणारे कुणी नाही आणि

आपल्यालाही शक्य होणार नाही असे मी त्यांना कळविले. त्यांना मी असेही कळविले कि पुण्यामध्ये जेव्हा भटक्या - विमुक्तांच्या वसाहतीमध्ये आवश्यकता लागेल तेव्हा मी तुम्हाला कळवतो. परंतु नकार एकूण देखील थांबेल तो विष्णु कुठला, त्यांच्या मनातली हुरहूर त्यांना शांत बसू देत नव्हती. अखेर त्याने पाट्समधील लोकांपर्यंत मदत पोहचवण्याचा यशस्वी प्रयत्न केलाच. त्याने तात्काळ इंदापूरच्या त्याच्या भावाला फोन करून मदत पोहचवण्यासाठी सांगितले. हे सर्व करेपर्यंत जवळजवळ संध्याकाळ उजाडली होती संध्याकाळी उशिरा इंदापूरवरून निघून पाटसला पोहचणे आणि पुन्हा माघारी जाणे शक्य नव्हते. परंतु दुसऱ्या दिवशी त्या ठिकाणी विष्णू यांचे बंधू सर्व मदत घेऊन पाटसला पोहचले. या ठिकाणच्या प्रत्येक कुटुंबाला १० दिवस पुरेल एवढा किराणामाल वाटण्यात आला. या वस्तीवरील सर्वांच्या चेहऱ्यावर या दिवशी एक विलक्षण आनंद पाहायला मिळाला.

यानंतर भटके विमुक्त युवा परिषदेचे कार्यकर्ते यांचा ७ एप्रिलला फोन आला. सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यामध्ये भिक्षेवर उदरनिर्वाह करून जगणाऱ्या भटक्या - जमातीतील लोकांना देखील मदतीची गरज आहे. या ठिकाणी जवळपास २० कुटुंब राहत असल्याचे समजले. हे सर्व लोक मुळचे करमाळा येथीलच रहिवासी असल्याचे कळाले. लॉकडाऊन मुळे घराबाहेर पडून भिक्षा मागणे या जमातींना पुढील काळात शक्य नव्हते. मी सर्व परस्थितीची सविस्तर माहिती घेऊन ८ एप्रिलला माझ्या फेसबुकवर पोस्ट लिहीली. नेहमीप्रमाणे अनेकांनी मदतीची इच्छा व्यक्त केली. भटक्या - विमुक्तांच्या चळवळीमद्ये कायम अग्रभागी असणारे आमचे मार्गदर्शक हेरंब कुलकर्णी सरांनी कमेंटमध्ये ॲड. सविता शिंदे यांचा संपर्क क्रमांक शेअर केला. आणि या आपल्याला मदत करू शकतील असे सांगितले. मी फोन करण्याआधी ॲड. सविता शिंदे यांनी कुलकर्णी सरांना, हे लोक नक्की कुठे आहेत? किती आहेत ? त्यांच्या पैकी कुणाचा नंबर मिळू शकेल का? हे सगळे प्रश्न विचारून झाले होते. कुलकर्णी सरांना या सर्व प्रश्नाची उत्तरे म्हणून माझा संपर्क क्रमांक सविता शिंदे यांना शेअर केला होता. कुलकर्णी सरांनी सविता शिंदे यांना प्रशासनाला मदत करण्याचे सुचवावे असे सांगितले. तोपर्यंत शिंदे यांनी स्थानिक प्रशासनाला कळवून मदतीची देखील सोय झाल्याचे कुलकर्णी सरांना कळविले. याच भागामध्ये वास्तव्यास असणारे आमचे मित्र पा.प्रदीप मोहिते यानी या संभाषणादरम्यान प्रशासनाला प्रामाणिक इच्छा असूनही अद्याप मदत करता आली नाही अशी खंत व्यक्त केली. या कमेंटवर उत्तर म्हणून सविता शिंदे यांनी तहसीलदार व मदत समिती समन्वयक यांच्याशी बोलणे झाले असून ते उद्यापासून आवश्यक ती सर्व व्यवस्था करतील असे सांगितले. यानंतर मोहिते सरांनी 'आपणही उद्या मदत घेऊन जावूया' असे शिंदे यांना सुचविले. दरम्यान आमचे पुण्यातील मित्र किरण सुरवसे यांनी त्यांच्या करमाळ्यातील मित्राला देखील मदत करण्यास सांगितले. अनेक मित्र, संघटना आणि संस्थांचे देखील फोन आले. सर्वांनी मदत करण्याची इच्छा व्यक्त केली. १३ एप्रिल रोजी सर्व पातळीवरची मदत या लोकांना पोहच झाली.

या सर्व घडामोडी घडत असतानाच्या काळामध्ये आमचे मित्र व मार्गदर्शक भटक्या विमुक्तयांच्या चळवळीचे हितचिंतक, 'यशदा' या संस्थेतील सामाजिक न्याय विभागाचे माजी संचालक मा. रविंद्र चव्हाण सरांनी भटक्या-विमुक्त जमातींना चालू असलेल्या मदत कार्याचा फेसबुक वरून आढावा घेतला. ते मित्र यादीमध्ये असल्यामुळे त्यांना रोजच्या - रोज काहीतरी चालू असल्याचे अपडेट मिळत होते. हे सर्व बघून सरांनी फोन केला. सरांनी मदत करण्याची इच्छा व्यक्त केली. त्याचबरोबर त्यांनी वस्त्यांमध्ये वास्तव्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची देखील माहिती घेतली. मा. सलीम छप्परबंद यांचा संपर्क क्रमांक त्यांना दिला व सलीम छप्परबंद यांना दुखील सर्व सविस्तर माहिती देऊन त्यांना चव्हाण सरांना फोन करून सविस्तर सर्व माहिती घेतली व एक महिना पुरेल एवढ्या किराणामाल वाटपाचे नियोजनही केले. लगेच दुसऱ्या दिवशी चव्हाण सरांच्या माध्यमातून पुणे शहरातील जवळपास २५० लोकांना किमान महिनाभर पुरेल एवढ्या किराणा मालाचे वाटप झाले. यामुळे छप्परबंद, मदारी, वडार,गोसावी,कैकाडी या जमातींना खूप महत्वाची मदत झाली. यामध्ये चव्हाण सरांच्या माध्यमातून 'बहुजन हिताय' संस्थेने मोलाचे सहकार्य केले. यानंतर भटके विमुक्त युवा परिषदेच्या उपाध्यक्षा शैला यादव यांनी आष्ट्यातील लोकांना मदतीची गरज असल्याचे १२ एप्रिल रोजी कळविले मी स्थानिक लीकांचा फोन नबर घेतला आणि त्यांच्याशी बोलून सविस्तर माहिती घेतली. या ठिकाणच्या माणसांनी असे सांगितले कि, 'गेली ५० वर्षे झाली आम्ही याच ठिकाणी राहतो आहोत. आम्ही या ठिकाणी



केसांवर भांडी विकून आमचा उदरनिर्वाह करतो. तसेच आमच्यातील काही लोक भंगार गोळा करण्याचे काम करतात.' या वस्तीतील जवळपास ४० कुटुंबे पोट भरण्यासाठी बाहेरगावी गेलेली होती. ३०-३२ कुटुंबच गावात होती. त्यापैकी साधारण १४ कुटुंब अशी आहेत होती, ज्यांच्याकडे रेशनकार्ड नव्हती. परंतु रेशनकार्ड असणाऱ्यांनाही रेशनवर केवळ गहू-तांदूळच मिळालेला होता. तेल, मीठ, मिरची काहीच नव्हते.

मी नेहमीच्या शिरस्त्याने मिळालेली माहिती संक्षिप्त रुपात फेसबुक लिहिली. सदर माहिती वाचून सर्वप्रथम पुणे विद्यापीठ समाजशास्त्र विभागातील आमचे मित्र आणि मार्गदर्शक डॉ.संजय कोळेकर सरांचा फोन आला. तेही मुळचे याच भागामध्ये वास्तव्य करणारे आणि भटक्या विमुक्तांच्या चळवळीत गेली अनेकवर्ष योगदान देणारे आहेत. सरांनी मला निरोप दिला कि, आष्टा हे गाव ज्या तालुक्यामध्ये येते त्या वाळवा तालुक्यातील मित्रांना त्यांनी फोनवर कळविले आहे. कोळेकर सरांच्या मदतीने अनेकांपर्यंत माहिती पोचवण्यात आली. मग मी थोडासा निश्चिंत झालो. पण दररोज मी या लोकांना सातत्याने फोन करून माहिती घेत होतो. यानंतर हेरब कुलकर्णी, सागर गोलपागर, मोहिनी कारंडे, अक्षय राजगे, सुभाष वारे, नितीन साळुंखे या सर्वानीच फोन करून सदर लोकांची माहिती घेतली आणि मदत करण्याचे प्रयत्न करतो आहोत असाही निरोप दिला. दोन दिवसांनी अनपेक्षितपणे एक फोन आला. हा फोन होता वाळव्याचे तहसीलदार रविंद्र सबनीस यांचा. यांनी मला विचारले, 'आपण आष्ट्यातील भटक्या-विमुक्त लोकांसदर्भात महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती नीलमताई गोऱ्हे यांना निरोप दिला होता का?' तर मी त्यांना 'हो' म्हणून सांगितले? मी त्यांना विचारले, 'तुम्हाला कोणी सांगितले?' ते म्हणाले, ताईंचे विशेष कार्य अधिकारी रणखांब सरांनी या संदर्भात फोन केला होता.' नंतर ते म्हटले दोन दिवसांमध्ये किट तयार करून त्यांच्यापर्यंत पोहचवायची व्यवस्था करतो...

यानंतर पुणे-नगर रोडवरील कारेगाव या ठिकाणी वास्तव्यास असणाऱ्या भटक्या जमातीतील लोकांना अडचणी आहेत असा निरोप मिळाला. मी या ठिकाणचा फोन घेऊन सर्व परस्थिती जाणून घेतली. नेहमीप्रमाणे मी माझ्या फेसबुक वालवर सदर परस्थिती कथन करणारी पोस्ट शेअर केली आणि या ठिकाणच्या स्थानिक लोकांना मदतीचे आवाहन केले. आवाहनाची दखल घेत तात्काळ प्रा. सुभाष वारे सरांनी या भागामध्ये वास्तव्यास असणारे त्यांचे मित्र नाथाभाऊ शेवाळे यांच्याशी बोलून या लोकांची जेवणाची सोय करण्यास सांगितले... यानंतर या भागातील स्वयंसेवी संस्थेच्या वैशाली चव्हाण यांनी देखील यांना किराणा मालाचे वाटप करता येईल असे सांगितले. २० एप्रिलला या लोकांना किराणा मालाचे व धान्याचे वाटप केल्याचा वैशाली चव्हाण आणि पत्रकार यांचा मला फोन आला.

दरम्यानच्या काळामध्ये १७ एप्रिल रोजी मु.कात्रज पोस्ट.जिंती. ता.करमाळा जि.सोलापूर या ठिकाणी वास्तव्यास असणाऱ्या भिक्षेवर आपला उदरनिर्वाह करणाऱ्या भटक्या जमातीतील लोकांना मदतीची गरज असल्याचे कळले. या ठिकाणी जवळपास १० कुटुंबे वास्तव्य करीत होती. सर्वजण मुळचे याच ठिकाणचे रहिवासी. मी या लोकांना फोन केला. ते म्हणाले, ''आम्ही बरीच वर्षे झाली याच ठिकाणी राहतो आहोत. भिक्षा मागून पोट-पाणी चालवतो. परंतु सध्या या आजाराच्या काळात आम्हाला पोटा पाण्यासाठी बाहेर फिरता येत नाही. आम्ही जगायां कस? तुम्हीच आम्हाला काहीतरी मदत करा.'' मी त्यांना विचारले, ''तुम्हाला आतापर्यंत शासनाची काहीच मदत मिळाली नाही का?'' ते म्हणाले,



''आमचे गाव खूप आडबाजूला आहे. आजपर्यंत आमच्याकडे कुणी मदतीला देखील फिरकले नाही. आम्ही कुणाला सांगू पण शकत नाही. आमचं कुणी एकत पण नाहीत.'' मी त्यांना मदतीचे आश्वासन दिले. आणि फेसबुकवर माहिती लिहिली. पुन्हा मदतीसाठी फोन आले. साधारण दोन दिवसांनी या लोकांना सर्व आवश्यक ती मदत पोहचविण्यात आली. लोकांनी साहित्य मिळाले त्या दिवशी फोन केला. आनंद वाटला मी त्यांना सांगितले कि अजून काही मदत लागली तर सांगा...

लॉकडाऊन अजूनही सुरू आहे..मला माहिती मिळेल तसे मी आवाहन करतो आहे...लोक पुढे येत आहेत. पण मनात प्रश्न येतोय... भटके-विमुक्तांच्या भुकेचा प्रश्न दिवसेदिंवस असाच आक्राळ विक्राळ होत जाणार आहे. आभाळच फाटलंय. ठिगळ लावणार तरी कुठे कुठे...?

**- विनायक लष्करे,** भटके विमुक्त युवा परिषद


पत्रव्यवहारासाठी पत्ताः साथी, फ्लॅट नं.- ३ व ४, अमन ई टेरेस, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे-३८.
दूरध्वनी : ०२०- २५४ ७२३२५, ई-मेल - sathicehat@gmail.com / can@sathicehat.org